<u>नियमित दिवाणी दावा क्र. १५/२०१२</u>

CNR NO– MHST–0700–0091–2012

<u>निशाणी क्र. ११३ खालील आदेश</u>

(पारित दिनांक २०/०२/२०२४)

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर येऊन दाव्याचे सरनाम्यात दुरुस्ती होऊन मिळावी, याकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादीचे असे कथन आहे की, सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र. ३ जयवंत राजाराम पाटील हे दि. २५/०६/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी यास **३(अ) वैशाली जयवंत पाटील, ३(ब) श्रीकांत जयवंत पाटील, ३(क) सानिका जयवंत पाटील सर्व रा. महादेव मंदिराजवळ, साळशिरंबेकर, कालवडे, ता.कराड, जि.सातारा,** हे कायदेशीर वारस असून अन्य कोणीही वारस नाहीत. वादीचे यांनी पुढे असे नमूद केले आहे की, मयत जयवंत राजाराम पाटील यांस वर नमूद वारसांव्यतिरिक्त अन्य वारस नाहीत. तसेच सदरकामी मयत प्रतिवादी नं.३ जयवंत राजाराम पाटील यांचे नावापुढे "मयत वारस" असे शब्द लिहून दुरुस्ती करणेची परवानगी मिळावी, अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन सदरील अर्जास आक्षेप घेतला आहे.

०४. वादीचे व प्रतिवादी यांचेतर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अर्ज, म्हणणे व मुळ दावा यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीचे प्रतिवादी क्र. ३ जयवंत राजाराम पाटील हे दि. २५/०६/२०२२ रोजी मयत झाल्याचे त्यांचे मृत्यु प्रमाणपत्र (नि.क्र.११८) च्या कागदयादीसोबत दाखल केले आहे, त्यावरुन दिसून येते. त्यामुळे मूळ

दाव्याचा वाद विषय पाहता मयत प्रतिवादी क्र. ३ जयवंत राजाराम पाटील यांचे वारस प्रस्तुत कामी रेकॉर्डवर असणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे सदर अर्जात वादीचे करुन मागत असलेली दुरुस्ती करणे गरजेचे आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करते.

## <u>आ दे श</u>

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीचे यांनी सदरची दुरुस्ती नियमानुसार विहीत कालावधीत करुन निशाणी १ ची दुरुस्तप्रत न्यायालयात दाखल करावयाची आहे.

ठिकाण– कराड (श्रीमती पी.एस.भोसले)
दिनांक– २०/०२/२०२४ ३रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, कराड.